**रेग्यु. दिवाणी मुकदमा नं.२६५/०९ मधील नि. १९२ खालील आदेश**

१. वादीने प्रस्तुतचा दावा हा दावा मिळकतीत पुर्व बाजुच्या आठ आणे क्षेत्रात प्रतिवादीने केलेला अनाधिकाराचा कब्जा वादीस प्रतिवादीकडुन मिळावा यासाठी तसेच सदर वादातील मिळकतीचा वादी हा मालक आहे असा मालकीहक्क विज्ञापनाचा जाहीर ठराव होवुन मिळाव यासाठी दाखल केला असुन दावा दाखल केलेनंतर प्रतिवादी क्र.१ ने प्रतिवादी क्र. २ चे लाभात करुन दिलेला खरेदीचा दस्तऐवज वादीवर बंधनकारक नाही असा जाहीर ठराव होवुन मिळावा यासाठी दाखल केला आहे. तसेच सदर दावा दाखल केलेनंतर वादी—प्रतिवादी यांचेमध्ये दाव्याचे कामकाज अदयाप चालु असताना व यातील प्रतिवादी क्र.२ यांना दावा मिळकत कोणाही ति—हाईतास विकु नये व त्यावर कोणताही बोजा निर्माण करु नये अशी स्थगिती आदेश नि. ४६ला दिले असताना व ते अस्तीवात असताना प्रतिवादी क्र. २ याने दावा मिळकत ति—हाईतास विक्री केली असलेने याकामी प्रतिवादी नं.३ व ४ यांना या दाव्यात सामील करुन घेतले असुन सदरील प्रतिवादी क्र.४ यांनी पुन्हा कोणासही कुठल्याही मार्गाने तबदिल करु नये व दाव्यात कुठल्याही प्रकाराचे बॅकेचा अगर पतसंस्थेचा बोजा निर्माण करु नये वा थर्ड पार्टी इंटरेस्ट तयार करुन नये तसेच वादीचे दावा मिळकतीतील पश्चिम बाजुस जी वादीची मिळकत आहे त्यामध्ये शांततामय वहिवाटीस हरकत व अडथळा करु नये व जी दावा मिळकत पुर्व बाजुची आहे त्या दावा मिळकतीची जैसे थे परिस्थिती ठेवणेसाठी सदरचा अर्ज दाखल केला आहे.

२. प्रतिवादी क्र. ४ यांनी वादीचे तुर्तातुर्त अर्जास नि.२०५ खाली म्हणणे दिले आहे. त्यामध्ये वादी शिवाजी रावसो कुंभार व प्रतिवादी नं.१ प्रल्हाद रावसो कुंभार यांचेत दावा मिळकतीचे आपआपसात सरस निरस मानाने वाटप करुन घेतलेले आहे. त्यामध्ये लिहुन देणार आणि लिहुन घेणार अशा वादी व प्रतिवादी क्र.१ यांच्या त्यावर सहया असुन साक्षीदारांचेही सहया आहेत. वादीने या दाव्यात प्रतिवादी क्र. ४ यांना

सामील केले आहे परंतु या प्रतिवादीचा वादीशी व त्याचे क्षेत्राशी काही एक संबंध नाही. प्रतिवादी क्र. १ यांनी प्रतिवादी क्र. २ यांना वाद मिळकत ही दि.२३/२/२०१० रोजी खरेदीदस्ताने दिलेली आहे. याची कल्पना वादीस होती. तसेच त्यानंतर प्रतिवादी क्र. २ यांनी प्रतिवादी क्र. ३ यांना दि. ५/४/२०१६ रोजी कायम खुष खरेदी करुन दिलेबाबतही वादीस पुर्ण कल्पना होती असे असतानाही दोन्ही वेळेस वादीने हरकत घेतलेली नाही. तसेच प्रतिवादी क्र.३ यांना त्यांचे माळवडी, ता. माण येथुन मिळकत पाहणे शक्य होत नसलेने त्यांनी प्रतिवादी क्र. ४ यांना दि.१९/१०/२०१६ रोजी वाद मिळकतीचे खरेदीपत्र करुन दिलेले आहे. त्यानंतरही वादीने या प्रतिवादी क्र. ४चे कब्जे वहिवाटीस अडथळा केलेला नव्हता व नाही. सबब वादीचा तुर्तातुर्त अर्ज नामंजुर करणेत यावा अशी विनंती केली आहे.

३. सन्माननीय दोन्ही वकिलांचे युक्तीवाद व म्हणणे ऐकले. दोन्ही पक्षकारांनी दाखल केलेले कागदपत्रांची पडताळणी केली. त्यावरुन खालील मुद्दे माझेपुढे उपस्थित होतात त्यावरील निष्कर्ष कारणमीमांसे सह त्याखाली देत आहे.

| अ.नं. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | वादीला प्रथमदर्शनी केस आहे असे वादी सिध्द् करतो काय? | होय |
| २ | सोईगैरसोईचा तराजु कोणाचे बाजुने आहे? | वादीचे |
| ३ | कोणाचे अपरिमीत नुकसाना होणार आहे? | वादीचे |
| ४ | आदेश काय? | अंतिम आदेशाप्रमाणे |

## कारणमीमांसा

४. **मुद्दा क्र. १ ते ४:—**

अर्जातील कथनाची पुर्नरावृत्ती होऊ नये म्हणुन सदरचे मुद्दे निष्कर्षाकरीता एकत्र घेतलेले आहेत. वादीचे वकिलांनी असा युक्तीवाद केला की, दावा मिळकतीत पुर्व बाजुच्या आठ आणे क्षेत्रात प्रतिवादीने केलेला अनाधिकाराचा कब्जा वादीस प्रतिवादीकडुन मिळावा तसेच

सदर आठ आणे मिळकतीचा वादी हा मालक आहे असा मालकी हक्क विज्ञापणाचा जाहीर ठराव होवुन मिळावा यासाठी व दावा दाखल केलेनंतर प्रतिवादी क्र. १ ने प्रतिवादी क्र. २ चे लाभात करुन दिलेले खरेदीचा दस्तऐवज वादीवर बंधनकारक नाही असा जाहीर ठराव होवुन मिळावा अशी मागणी केली आहे. तसेच प्रतिवादी क्र.४ ने सदर दावा मिळकतीचा कोणाही बरोबर खरेदी—विक्रीचा व्यवहार करु नये व दावा मिळकतीवर कोणाचाही बोजा निर्माण करु नये, केल्यास तो वादीवर बंधनकारक नाही असाही युक्तीवाद केला आहे. तसेच सन १९९२ पासुन दावा मिळकतीमध्ये वादीचीच कब्जेवहिवाट आहे.

५. प्रतिवादीचे विद्वान वकील श्री. आर. जी. सहस्रबुध्दे यांनी युक्तीवाद केला की, दावा हा मुदतीत नाही. वादीने फेरफार नं. ३६३ च्या नोंदीबद्दल कुठल्याही सक्षम न्यायालयात आव्हान दिले नाही. वादी व प्रतिवादी यांचे दावा मिळकतीचे दि.१८/६/१९९२ साली वाटप झाले व त्या वाटपाआधारे फेरफार नं.३६३ च्या नोंदी झाल्या. महाराष्ट्र महसुल संहिता कलम १५७ अन्वये महसुली नोंदी हया ग्राहय पुरावा आहेत. प्रतिवादीने वादीस दावा मिळकतीतुन हुसकावुन लावले याबदद्ल सकृतदर्शनी पुरावा नाही. सन १९९२ पासुन प्रतिवादीचे दावा मिळकतीत ७/१२ च्या उता—यास नोंद आहे. वादीची केस ही सकृतदर्शनी नाही. न्यायतत्वाचा तराजु हा वादीचे बाजुने नसुन प्रतिवादीच्या बाजुने आहे.

६. वादीचा अर्ज, प्रतिवादीचे म्हणणे आणि अभिलेखावरील सर्व दस्तऐवज पडताळले. वादीने सदरचा दावा कब्जा करिता आणि अनुषंगीक ताकीदीकरीता दाखल केलेला आहे.

७. माझ्या मा. पुर्वाधिका—यांनी प्रतिवादी क्र. २ यास दावा मिळकतीत अंतीम निकालापर्यत कोणतीही तबदील करु नये असा तुर्तातुर्त मनाई आदेश दिला होता. मात्र तरीही प्रतिवादी क्र. २ याने प्रतिवादी क. ३ व ४ यास दावा मिळकत रजिष्टर कायमखुष खरेदीखताने तबदील केले. प्रतिवादी क्र. ४ याने कोणालाही दावा मिळकत तबदील करु नये म्हणुन वादीने सदरचा अर्ज केला आहे.

८. माझ्या मते प्रतिवादी क्र. ४ याने दावा मिळकत त्रयस्थ इसमास तबदील

केली तर दाव्यात गुंतागुंत निर्माण होईल. त्यामुळे दावा मिळकतीच्या संरक्षणासाठी प्रतिवादी क्र. ४ विरुध्द तुर्तातुर्त मनाई आदेश देणे गरजेचे आहे. सबब मी खालील आदेश पारीत करते.

**आदेश**

१. वादीचा नि.१९२ वरील अर्ज मंजुर करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्र.४ याने दावा मिळकती दाव्याचा निकाल लागेपर्यत त्रयस्थ इसमास तबदील करु नये.

फलटण (अर्चना ह. ठाकुर)
ता.९/७/२०१८ दिवाणी न्यायाधीश क. स्तर, फलटण